**हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी व ग्रामीण लोककल्याण अभियानांतर्गत आरोग्य विषयक उपक्रम राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०२६/प्र.क्र.७४ /समन्वय (ई-१६१२८४८)**

लो.ति.मार्ग, गोकूळदास रूग्णालय संकूल इमारत

८ मजला, मंत्रालय, मुंबई-४०००01.

दिनांक : २५ मे, २०२६

संदर्भ: नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:-संकिर्ण-२०२६/प्र.क्र.१२/नवि-१६ (ई-१५३६२७०) दिनांक २३.०१.२०२६.

**प्रस्तावना:-**

नगर विकास विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी सामाजिक, सांस्कृतिक व लोककल्याणाच्या क्षेत्रात दिलेले व्यापक योगदान विचारात घेऊन त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नागरी व ग्रामीण स्थानिक संस्थांमध्ये सर्वांगीण विकास साधण्यासाठी लोककल्याण अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये नागरी व ग्रामीण स्थानिक संस्था क्षेत्रातील शाळांची विशेषत: मराठी शाळांची गुणवत्ता वृध्दी, आरोग्याच्या विशेषत: महिला आरोग्यासाठी उत्तम सुविधा उपलब्ध करणे, पर्यावरण व स्वच्छता, पर्यटन विकास तसेच स्थानिक संस्थांना आत्मनिर्भर होण्यासाठी प्रोत्साहन देणे या उद्देशाने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी व ग्रामीण लोककल्याण अभियान राबविणे व सदर अभियानांतर्गत विकसित करण्यात आलेल्या सुविधांची विभाग स्तरावर स्पर्धा आयोजित करणे याबाबींचा समावेश आहे.

सदर अभियानांतर्गत नागरी तसेच ग्रामीण भागासह संपुर्ण महाराष्ट्रात आरोग्य विषयक उपक्रम राबविणे, आरोग्य सेवा गुणात्मक व परिणामकारक स्वरुपात उपलब्ध करुन देणे, आरोग्य सेवा सुविधा बळकट करणे, आरोग्य संस्थांचे सक्षमीकरण करणे व तद्नुषंगीक बाबीसंबंधी अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी व ग्रामीण लोककल्याण अभियानांतर्गत आरोग्य विषयक उपक्रम राबविणे, आरोग्य सेवा गुणात्मक व परिणामकारक स्वरुपात उपलब्ध करुन देणे, आरोग्य सोयी सुविधा बळकट करणे, आरोग्य संस्थांचे सक्षमीकरण करणे व तद्नुषंगीक बाबीसंबंधी अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

२. सदर आरोग्य विषयक उपक्रमांमध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात येत आहे.

**१. नागरी क्षेत्रासाठी आरोग्य संस्था कार्यान्वित करणे**:- महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती व कटक मंडळे या नागरी क्षेत्रात राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत ३५१

ठिकाणी नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिरे व २६ ठिकाणी पॉलिक्लिनिक या नागरी आरोग्य संस्था व राज्य योजनेंतर्गत ३१ ठिकाणी हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने कार्यान्वित करण्यात येतील.

**<u>२.रिक्त पदे भरणे</u>**:- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत नागरी आरोग्य संस्थांकरीता वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची एकुण ६,२५८ रिक्त पदे व राज्य योजनेंतर्गत हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने याकरीता वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची एकुण ५६५ रिक्त पदे विशेष मोहिमेद्वारे भरण्यात येतील. आशा स्वयंसेविकांची नागरी क्षेत्राकरीता एकुण १०९५ रिक्त पदे विशेष मोहिमेद्वारे भरण्यात येतील.

**<u>३. जन आरोग्य समित्या/रुग्ण कल्याण समित्या गठीत करणे</u>**:- नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे (८१८), नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिरे (२२३२) व हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने (७००) यांकरीता जन आरोग्य समित्या आणि नागरी समुदाय आरोग्य केंद्रे (४४) यांकरीता रूग्ण कल्याण समित्या गठित करण्यात येतील.

**<u>४.महिला आरोग्य समित्या गठीत करणे</u>**:- नागरी आरोग्य संस्थांच्या क्षेत्रात एकुण १०,९५२ महिला आरोग्य समित्या गठित करण्यात येतील.

**<u>५.आरोग्य सेवा पुरविणे</u>**:- :- नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे , नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिरे व हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या आरोग्य संस्थांमध्ये बाह्यरुग्ण सेवा (मोफत तपासणी व उपचार), मोफत औषधोपचार, मोफत प्रयोगशाळा तपासणी, गर्भवती मातांची तपासणी, मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन सेवा, मोफत लसीकरण सेवा व आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा या गुणात्मक व परिणामकारक स्वरूपात पुरविण्यात येतील.

**<u>६. नागरी क्षेत्रासाठी आरोग्य सेवा-सुविधा बळकटीकरण करणे</u>**:- जिल्हा शल्य चिकित्सक यांनी नगर विकास विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयानुसार आरोग्य सेवा सुविधा बळकटीकरणासाठी अनुज्ञेय बाबी व मंजूर निधी विचारात घेऊन खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(i) जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, आयुष रुग्णालये, नागरी आरोग्य संस्था व आपला दवाखाने येथील आरोग्य सेवा सुविधा बळकट करण्यासाठी आवश्यक असलेल्या मुलभूत सोयी सुविधांची निश्चिती करावी.

(ii) सदर मुलभूत सोयी सुविधांमध्ये आरोग्य साहीत्य, आरोग्य विषयक उपक्रमांचे माहितीफलक लावणे, डिजीटल स्वरुपात माहिती प्रसिध्दीसाठी उपाययोजना करणे, महिलांसाठी सॅनिटरी पॅड्स मशिन, परिसर सुशोभिकरण, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, संरक्षक भिंत, रंगरंगोटी करणे, वृक्षारोपण, रुग्णांकरीता बैठक व्यवस्था/प्रतिक्षालय, विद्युत व्यवस्था, शौचालय, जैविक घनकचरा व्यवस्थापन/ विल्हेवाट करणे इत्यादी बाबींचा समावेश राहील.

(iii) वरीलप्रमाणे आरोग्य सेवा सुविधा बळकटीकरणासाठी प्रस्ताव विहीतरितीने तयार करावेत व संबंधित महानगरपालिका/ नगरपरिषदा/नगर पंचायती या कार्यान्वयन यंत्रणेकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करावेत.

(iv) जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन महानगरपालिका/नगर परिषदा/नगर पंचायती या कार्यान्वयन यंत्रणेमार्फत मुलभूत सोयी सुविधा निर्माण कराव्यात.

**७. ग्रामिण भागात आरोग्य संस्था कार्यान्वित करणे**:-

१. संपूर्ण महाराष्ट्रातील १९५८ प्राथमिक आरोग्य केंद्र व १०७८८ उपकेंद्रांमध्ये हिंदूह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाअभियान राबवण्याचे निर्देश देण्यात येत आहे.

२. सर्व ग्रामीण संस्थांमध्ये नियमित मासिक बैठका घेण्यात याव्यात. दवाखाने स्वच्छ व कर्मचाऱ्यांची सौजन्याची वागणूक गरजेची आहे.

३. सर्व १३ प्रकारच्या सेवा नियमित देण्यात याव्या व त्याच्या नोंदी ठेवण्यात याव्यात.

४. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ६३ प्रकारच्या तपासण्या व उपकेंद्रांमध्ये १४ प्रकारच्या तपासण्या अपेक्षित आहेत. सर्व ३० वर्षावरील स्त्रियांचा ब्रेस्ट कॅन्सर, सर्वाइकल कॅन्सर, ओरल कॅन्सर व मेनोपॉज मधील समस्या बाबत वार्षिक तपासणी करण्यात यावी.

५. सर्व ग्रामीण आरोग्य संस्थांना स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत प्रा.आ.केंद्र व उपकेंद्रांच्या अंतर्गत स्वच्छता,परिसर स्वच्छता व वृक्षारोपण करून सुशोभीकरण करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

६. सर्व वयोगटांसाठी आवश्यक सेवा उपलब्ध असाव्यात व इतर सर्व राष्ट्रीय व राज्य कार्यक्रमांची अंमलबजावणी प्रभावीपणे राबविण्यात यावी.

७. प्रा.आ.केंद्र व उपकेंद्रामध्ये औषधांचा गरजेनुसार नियमित साठा उपलब्ध राहील याची खात्री करावी.

८. आर बी एस के कार्यक्रमांतर्गत सर्व शाळा व अंगणवाडी विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी नियमानुसार करण्यात यावी.

**८. झीरो प्रिस्क्रिपशन**:- शासनाच्या दि. ७ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये उपचार घेणा-या रुग्णांना आवश्यक औषध यादी (Essential Drug List) मधील औषधे विनाशुल्क पुरविण्यात यावीत असे निर्देशीत करण्यात आले आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये रुग्णांना बाहेरुन औषधे लिहून देण्यात येऊ नये.

**९.महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना:-** सदर योजनेंतर्गत शासकीय रुग्णालयात उपचार घेणाऱ्यांची टक्केवारी वाढविण्याबाबत भर देणे. योजनेतील एकूण लाभार्थ्यांपैकी शासकीय रुग्णालयात लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचे प्रमाण १७% वरून ४० % पर्यंत वाढवणे. तसेच MJPJY/PMJAY कार्ड निर्माण करुन वितरीत करणे. रेशनकार्ड धारक ९.७४ कोटी लाभार्थ्यांपैकी

आयुष्मान कार्ड तयार करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची संख्या ३.९४ कोटी (४०%) वरून ७.३० कोटी ( ७५%) इतकी वाढवणे.

**<u>१०. रुग्णालय अंगीकरणासाठीचे प्रयत्न:-</u>** मोठ्या व नामांकित खाजगी रुग्णालयांना अंगीकरणासाठी प्रोत्साहित करण्याकरिता वरिष्ठ स्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात यावे. ग्रामीण भागातील रुग्णालयांना योजनेत अंगीकृत करण्यास प्राधान्य देण्यात यावे.

**<u>११. योजनेची प्रसिध्दी:-</u>** योजनेचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांनी घ्यावा यासाठी योजनेची माहिती क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत, प्रसिध्दी माध्यमांव्दारे व समाज माध्यमांव्दारे सर्वापर्यंत पोहचवण्यात यावी.

**<u>१२. आयुष्मान भारत कार्ड निर्मिती:-</u>** सध्या एकूण शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांपैकी ४०% लाभार्थ्यांचे आयुष्मान भारत कार्ड निर्माण करण्यात आले आहेत. अभियान कालावधीत आशा सेविका, आपले सरकार सेवा केंद्र चालक व स्वस्त धान्य दुकान चालक यांच्याकडून घरोघरी भेट देऊन शिल्लक लाभार्थ्यांची ई-केवायसी करुन आयुष्मान भारत कार्ड तयार करण्यात यावेत. त्यानुसार ७० हून अधिक वयाच्या लाभार्थ्यांच्या उपलब्ध डाटाबेसमधून वय वंदना कार्ड तयार करणे व नियमित आयुष्मान कार्डकरिता उर्वरीत लाभार्थ्यांच्या डाटाबेसमधून ई-केवायीसी करण्यात यावी.

**<u>१३. मेनोपॉज क्लीनिक स्थापना:-</u>** रजोनिवृत्ती हा महिलाच्या आयुष्यातील महत्वाचा व अत्यंत संवेदनशील टप्पा असल्याने व या काळात होणारे शारिरिक, मानसिक व हार्मोनल असंतुलन याकडे महिलांचे दुर्लक्ष होत असल्याने, समाजाची हिच गरज ओळखून राज्य शासनाने या वयोगटातील सर्व महिलांच्या रजोनिवृत्ती तपासणी मोहिम (Menopause Clinic) उपरोक्त शासकीय रुग्णालयात नियमितपणे सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. या माध्यमातून स्त्रीरोग तज्ञांकडून तपासणी, वैद्यकिय सल्ला, समुपदेशन, औषधोपचार व मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या मोहिमे अंतर्गत खालील प्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

- राज्यातील जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालय, मनपा रुग्णालय तसेच निवडक ग्रामीण रुण्गालयामध्ये जिथे स्त्री रोग तज्ञांची सेवा उपलब्ध आहे आशा ठिकाणी रजोनिवृत्ती तपासणी मोहिम (Menopause Clinic) सुरु करण्यात यावी.
- दर बुधवारी रजोनिवृत्तीतपासणी कक्ष (Menopause Clinic) मध्ये बाह्यरुग्ण तपासणी करण्यात यावी.
- या अंतर्गत खालील सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

१) स्त्री रोग तज्ञांकडून तपासणी
२) आवश्यक वैद्यकिय तपासणी
३) औषधोपचार
४) मानसिक आरोग्य विषयक समुपदेशन
५) आहार व जीवनशैलीविषयक मार्गदर्शन

- सदरील योजनेची प्रभावीपणे जनजागृती करण्यात यावी.
- रजोनिवृत्तीतपासणी कक्ष (Menopause Clinic) तपासणीचा लाभ घेतलेल्या लाभार्थी यांची सविस्तर नोंद व संख्या यांचा अहवाल दरमहा सादर करण्यात यावा. सहाय्यक संचालक (वै.), यांनी परिमंडळातील जिल्हयांचा आढावा दरमहा घेऊन आवश्यक ते नियोजन व कार्यवाही पुर्ण करण्यात मदत करतील, जेणेकरुण या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होईल. अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुणे यांचे मार्गदर्शनाखाली या बाबतचा आढावा व सनियंत्रण करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५२५१५३६२०५४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEEPAK NIVARTTI KENDRE

Digitally signed by DEEPAK NIVARTTI KENDRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=438E1C3198EEAF94D4E0935B5B64B843D8C7195FB67EB9E8292985B766C4EFC8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C351F74FB3439ACA71466FCFBB2509C3310AE753E395A89FFA7C6E3887B0AADF, cn=DEEPAK NIVARTTI KENDRE
Date: 2026.05.25 16:30:48 +05'30'

**( दीपक केंद्रे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. मा. मुख्यमंत्री महोदयाचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई.
८. मा. उप मुख्यमंत्री व मंत्री (नगर विकास, गृह निर्माण) यांचे प्रधान सचिव
९. मा. उप मुख्यमंत्री व मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव
१०. मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, मंत्रालय, मुंबई
११. मा. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, मंत्रालय, मुंबई
१२. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
१३. प्रधान सचिव-१, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
१४. सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
१५. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ.अ., मुंबई
१६. संचालक, आरोग्य सेवा, (रुग्णालये), मुंबई

१७. संचालक, आरोग्य सेवा, (प्राथमिक) ,पुणे
१८. विभागीय आयुक्त, सर्व.
१८. जिल्हाधिकारी, सर्व.
१९ आयुक्त, सर्व महानगरपालिका
२०. सह सचिव/ उप सचिव (सर्व), सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई
२१. उपसंचाल, आरोग्य सेवा (सर्व)
२२. जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
२३. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
२४. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषद / नगरपंचायती
२५. सर्व कार्यासने, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई
२६. निवड नस्ती (समन्वय)